सभा क्र. 1

आज दि. 15.07.2019 माजी विद्यार्थी संघटनेच्या सर्व सदस्यांची सभा दुपारी 2.00 वाजता महात्मा गांधी कला- वाणिज्य महाविद्यालय पारशिवनी येथे मा. श्री. विजय मधुकर भुते यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेत खालील सदस्य उपस्थित होते.

1. श्री. विजय मधुकर भुते
2. श्री. राजेश रमेशराव सावरकर
3. लता विनोद झोड
4. श्री. चेतकराज याद्वराव इटनकर
5. श्री. शुध्दोधन कन्हैया कळमकर
6. श्री. अशोक भारतजी भक्ते
7. श्री. खुशाल मधुकर कापसे
8. श्री. मनोज अनिल गुरवे
9. श्री. विजय माधोराव भरणे.

सभेत खालील विषयावर चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आले.

| विषय | ठराव |
| --- | --- |
| विषय क्र. 1<br>मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | ठराव क्र. 1<br>मागील सभेत माजी विद्यार्थी संघटनेची कार्यकारीणी निवड प्रक्रीया पूर्ण झाली या सभेत अध्यक्ष, सचिव व इतर सदस्यांची निवड करण्यात आली. अशी माहीती संघटनेचे सचीव श्री. अनिल सावरकर यांनी दिली. यावेळी सभाध्यक्षांनी कुणाचा काही आक्षेप आहे का? असा प्रश्न केला. तेव्हा या निवडीवर कुणीही आक्षेप न घेतल्यामुळे मागील सभेत घेण्यात आलेला ठराव संमत करण्यात. मागिल सभेचे इतिवृत्त सर्वानुमते संमत करण्यात आले. |
| विषय क्र. 2<br>महाविद्यालय परिसरात वृक्षारोपन करणे. | ठराव क्र. 2<br>मा. सदस्य खुशाल कापसे यांनी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्याबाबतचा विषय चर्चेला आणला, त्यावेळी सभेचे अध्यक्ष श्री. विजय भुते यांनी सांगितले की, मी पारशिवनी नगरपंचायत येथे नगरसेवक |

आहे. नगरपंचायतीतर्फे त्यांनी महाविद्यालयाला वृक्षरोपटे देण्याचे मान्य केले. व दि. 15 ऑगस्ट २०१९ ला महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्याचे ठरले. ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

| विषय क्र. 3 | ठराव क्र. 3 |
|---|---|
| 15 ऑगस्ट या स्वातंत्र्यदिनी विशेष कामगिरी केलेल्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार | मा. सदस्य श्री. विजय भरणे यांनी आपल्या महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी विशेष कामगिरी केली आहे. अशा माजी विद्यार्थ्यांचा 15 ऑगस्ट या स्वातंत्र्यदिनी सत्कार केल्यास आज महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल असा विषय चर्चेला आणला, तेव्हा अशा विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी द्यावी अशी विनंती त्यांना करण्याचे ठरले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे डॉ. विनायक इरपाते यांचे अध्यक्षतेखाली घेण्याचे ठरले ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. |
| **विषय क्र. ४** | **ठराव क्र. ४** |
| माजी विद्यार्थी संघटना नोंदणी. | सद्यस्थितीत माजी विद्यार्थी संघटना ही नियोजित स्वरूपाची आहे. त्यामुळे तेव्हा संस्था नोंदणी अधिनियम १८६० नुसार संस्थेला वैधानिकता प्राप्त करण्यासाठी संस्थेची नोंदणी करणे आवश्यक आहे. असा विषय प्रा. डॉ. अशोक भक्ते यांनी चर्चेला आणला. तेव्हा हे संपूर्ण कार्य करण्यासाठी सचिव राजेश सावरकर, सदस्य खुशाल कापसे व महाविद्यालयातील प्रा. डॉ. राकेश कश्रे यांची समिती स्थापन करून संस्था नोंदणीचे अधिकार त्यांना देण्यात आले ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. |
| **विषय क्र. 5** | **ठराव क्र. 5** |
| मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय | मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर कोणतेही विषय न आल्यामुळे सभा समाप्तीची घोषणा अध्यक्षांनी केली. |

[signature]

सभाध्यक्ष

## सभेची सुचना

माजी विद्यार्थी संघटनेच्या (Alumni Association) सर्व सदस्यांना सुचीत करण्यात येते की, माजी विद्यार्थी संघटनेची सभा दि. ला महात्मा गांधी कला-वाणिज्य महाविद्यालय, पारशिवनी येथे दुपारी १.०० वाजता मा. श्री. विजय भूते यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे.

सभेचे विषय

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. संघटनेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडणे.
३. संघटनेसाठी निधी गोळा करणे.
४. कार्यकारीणीमधील सदस्यांकडून निधी गोळा करणे
५. राष्ट्रीय सेवा योजना शिबीरात मदत करणे.
६ मा अध्यक्षाच्या परवानगीने वेळेवर येणारे ~~खासगी~~ विषय.

१. श्री. विजय मधुकर भूते
२. श्री. चेतकराज यादवराव इटनकर
३. श्री. राजेश रमेशराव सावरकर
४. श्री. शुध्दोधन कन्हैया कळमकर
५. लता विनोद झोड
६. श्री. अशोक भारतजी भक्ते
७. श्री. खुशाल मधुकर कापसे
८. श्री. मनोज अनिल गुरवे
९. श्री. विजय माधोराव भरणे

तरी सर्वांनी सभेला उपस्थित रहावे. गणपूर्ती अभावी स्थगित केलेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी १५ मिनीटे उशिरा सुरु होईल याची नोंद घ्यावी

दि. १५/०८/२०१९ सभाध्यक्ष

स्थळ :- पारशिवनी

IQAC CO-ORDINATOR
Mahatma Gandhi Arts & Commerce College
Parseoni, Dist. Nagpur

PRINCIPAL
M. G. Arts & Commerce College
Parseoni, Dist. Nagpur

सभा क्र. २

आज दि. ३०/१/२०२० माजी विद्यार्थी संघटनेच्या सर्व सदस्यांची सभा दुपारी १.०० वाजता महात्मा गांधी कला- वाणिज्य महाविद्यालय पारशिवनी येथे श्री. विजय भुते यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेला खालील सभासद उपस्थित होते.

1. श्री. विजय मधुकर भुते
2. श्री. राजेश रमेश सावरकर
3. श्री. विजय माधोराव भरणे
4. श्री. खुशाल मधुकर कापसे
5. लता विनोद झोड
6. श्री. चेतकराज यादवराव इटनकर
7. श्री. मनोज अनिल गुरवे.

सभेत खालील विषयावर चर्चा होउन ठराव संमत करण्यात आले.

| विषय | ठराव |
|---|---|
| विषय क्र. १<br>मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे | ठराव क्र. १<br>मागील सभेत वृक्षारोपण, माजी विद्यार्थी सत्कार, संस्था नोंदणी इ. ठराव संमत करण्यात आले होते. त्यानुसार 15 ऑगस्ट २०१९ रोजी वृक्षारोपन व माजी विद्यार्थी सत्कार कार्यक्रम घेण्यात आला. तसेच संस्थेची नोंदणी करण्यात आली. अशी माहिती सचीव श्री राजेश रमेश सावरकर यांनी दिली. या विषयावर चर्चा होउन मागील सभेचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले. |
| विषय क्र. २<br>माजी विद्यार्थी संघटनेचे खाते राष्ट्रीयीकृत बँकेत उघडणे. | ठराव क्र. २<br>मागील सभेतील ~~निर्ण~~ ठरावानुसार संघटनेची संस्था नोंदणी अधिनियम १८६० नुसार सहाय्यक संस्था निबंध नागपूर येथे संस्थेची नोंदणी करण्यासाठी श्री. राजेश सावरकर, श्री. खुशाल कापसे व प्रा. डॉ. राकेश यांची समिती स्थापन केली होती. या समितीने संपूर्ण कागपत्रांची पूर्तता करून ती संबधित कार्यालयाकडे सादर केली. या कागदपत्रांची पडताळणी करून सहाय्यक निबंधक संस्था नागपूर यांनी ~~आप~~ या |

संस्थेची आपल्या प्रस्तावानुसार ॲल्युमनी असोशिएशन ऑफ महात्मा गांधी कला-वाणिज्य महाविद्यालय, पारशिवनी, जि. नागपूर अशी २५ ऑक्टोबर २०१७ ला नोंदणी केली आहे व या संस्थेला नोंदणी प्रमाणपत्र दिले आहे अशी माहिती सचीव राजेश सावरकर यांनी दिली.

संस्थेची सहाय्यक निबंधकाकडे नोंदणी झाल्यामुळे राष्ट्रीयकृत बँकेत खाते सुरु करण्याबाबतचा विषय श्री. चेतकराज इटनकर यांनी चर्चेला आणला या विषयावर चर्चा होउन असोशिएशनचे अध्यक्ष विजय भुते व सचिव राजेश सावरकर यांचे नावे संयुक्त खाते उघडण्याचे ठरले. या विषयावर चर्चा होउन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

| | |
|---|---|
| विषय क्र. ३<br>असोशिएशनसाठी निधी. | ठराव क्र. ३<br>ॲल्युमनी असोशिएशन ऑफ महात्मा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय, पारशिवनीचा उद्देश विधायक कार्य करणे हा असल्यामुळे कार्यकारणीतील सदस्यांनी काही निधी जमा करण्याचा विषय लता झोड यांनी चर्चेला आणला त्यानुसार प्रत्येकी ५००/- रु. गोळा करण्याचे ठरले ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. |
| विषय क्र. ४<br>अंतिम वर्षाची परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांकडून निधी. | ठराव क्र. ४<br>उपर्निदिष्ट विषयानुसार अंतिम वर्षाची परिक्षा पास होणारे विद्यार्थी सुद्धा या असोशिएशनला मदत करु इच्छितात. अशा इच्छुक विद्यार्थ्यांकडून रोख अथवा वस्तू स्वरुपात भेट स्विकारण्यास हरकत नाही. असा विषय खुशाल कापसे यांनी चर्चेला आणला. तेव्हा इच्छुक विद्यार्थ्यांकडून स्विकारण्यास हरकत नाही असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. |
| विषय. क्र. ५<br>राष्ट्रीय सेवा योजना शिबीरात मदत करणे. | ठराव क्र. ५<br>युवकाच्या उर्जेचा विधायक कार्य करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना हा उपक्रम महाविद्यालयात कार्यरत आहे. त्यामुळे विशेष श्रमसंस्कार शिबीरात अनेक गावातील माजी विद्यार्थ्यांचा |

सहभाग वाढवून राष्ट्रीय सेवा योजनेला जास्त कार्यक्षम बनविणे असा विषय मनोज गुरवे यांनी चर्चेला आणला या विषयावर चर्चा होउन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला।

| विषय क्र. 6 | ठराव क्र. 6 |
| --- | --- |
| मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय | मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर कोणताही विषय न आल्यामुळे सभा समाप्तीची घोषणा मा. अध्यक्षांनी केली |

दि. 30/01/2020

स्थळ :- पारशिवनी

सभाध्यक्ष

IQAC CO-ORDINATOR
Mahatma Gandhi Arts & Commerce College
Parseoni Dist. Nagpur

PRINCIPAL
M. G. Arts & Commerce College
Parseoni, Dist. Nagpur